# शेअर मार्केट

# म्हणजेच

# भरपूर पैसा

**(with SEBI's new Amendments)**

भारतीय प्रतिभुती आणि विनिमय मंडळ (सेबी) च्या आज पर्यंतच्या सुधारणांसह

**Tenth Edition 2016**

**(Marathi Edition)**

**By**

**सुभाष एच.पांडे** M.Com. MBA, DTL

**आणि**

**रविंद्र के.पाटील** B.Com. GDC & A

**दिशोत्तमा प्रकाशन,नाशिक**

4, टिळक कॉम्प्लेक्स, अर्हम आय हॉस्पिटल समोर, रचना विद्यालय रोड
कॅनडा कॉर्नर, नाशिक ४२२००२

मोबाइल नंबर्स ९१७५८८२११७ आणि ७३८५६९०४४७

**e-mail:- rceeducation@gmail.com**

**web site:- www.rceeducation.com**

**Price : Rs. 110/-**

---

1. शेअर मार्केट म्हणजेच भरपूर पैसा (दिशोत्तमा प्रकाशन नाशिकची उपलब्धी मो.९१७५८८२११७)

# अनुक्रमणिका Index


| प्रकरण नं. | विषय | पान नं. |
|---|---|---|
| **प्रकरण १** | **गुंतवणूक म्हणजे काय?** | **७** |
| | शेअर बाजार एक ओळख | ७ |
| | शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक किती करावी? | ८ |
| | गुंतवणूकीचे विविध प्रकार व त्यापासून मिळणारे सरासरी फायदे | ९ |
| | गोल्ड बाँड आणि गोल्ड मोनटायझेशन स्किम | १२ |
| | आर्थिक नियोजन अति महत्वाचे | १२ |
| **प्रकरण २** | **भारतीय शेअर बाजार** | **१४** |
| | शेअर आणि शेअर बाजार म्हणजे काय? | १४ |
| | स्टॉक एक्सचेंज म्हणजे काय? | १४ |
| | भारतीय प्रतिभुती आणि विनिमय मंडळ (सेबी) SEBI | १५ |
| | बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) BSE | १७ |
| | नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसई) NSE | २० |
| | प्रॉव्हिडंड फंडचा पैसा शेअर बाजारात | २१ |
| | भारतातील इतर स्टॉक एक्सचेंजेस | २२ |
| | ब्ल्यू चिप शेअर्स म्हणजे काय? | २९ |
| **प्रकरण ३** | **डिमॅट अकाउंट** | **३२** |
| | डिमटेरियलायझेशन आणि डिपॉझिटरी पार्टीसिपंट (डिपी) म्हणजे काय? | ३२ |
| | डिमॅट अकाउंट म्हणजे काय? | ३३ |
| | केवायसी आणि डिमॅट अकाउंट विषयी इतर माहिती | ३३ |
| | एसआयपी (नियमीत गुंतवणूक करणे म्हणजे काय?) | ३५ |
| | कॉन्ट्रॅक्ट नोट आणि शेअर्स ट्रेडिंग करण्याच्या पध्दती | ३६ |
| | शेअर्स ट्रेडिंग करण्याच्या पध्दती (माझा स्वतःचा अनुभव) | ३६ |
| | गुंतवणूकदारासाठी तक्रार निवारण आणि कोर्टाप्रमाणे एनएसईवरील फोरम | ३६ |
| **प्रकरण ४** | **शेअरबाजार,सेन्सेक्स आणि निफ्टी** | **४०** |
| | निर्देशांक (इंडेक्स) आणि सेन्सेक्स म्हणजे काय? | ४० |
| | मार्केट कॅपिटलायझेशन, फ्री फ्लोट मार्केट कॅपिटलायझेशन म्हणजे काय? | ४१ |
| | मार्केट कॅपिटलायझेशन, फ्री फ्लोट मार्केट कॅपिटलायझेशन कसा कॅलक्यूलेट होतो | ४१ |
| | सेन्सेक्स कसा कॅलक्यूलेट होतो | ४२ |
| | निफ्टी म्हणजे काय? तो कसा कॅलक्यूलेट होतो | ४२ |
| | शेअर्स ट्रेडिंगची संपूर्ण प्रक्रिया कशी होते | ४३ |
| | शेअर्स ट्रेडिंग करतांना स्टॉप लॉस जरुर लावा पण तो कसा लावावा | ४४ |
| | शेअर्स ट्रेडिंग करतांना उपयोगात येणारे शब्द आणि त्याचा अर्थ | ४४ |
| | प्रॉफिट बुकिंग म्हणजे काय? | ४६ |

| | | |
|---|---|---|
| | बीटा व्हॅल्यू म्हणजे काय? | ४६ |
| | पोर्टफोलिओ म्हणजे काय? त्याचे हेजिंग कसे करतात | ५१ |
| | पोर्टफोलिओ कसा मॅनेज करावा? | ५२ |
| | जगातील प्रमुख शेअर बाजार आणि उपयोगात येणारे निर्देशांक | ५४ |
| **प्रकरण ५** | **डेरिव्हेटिव्हज मार्केट (वायदे बाजार) म्हणजे काय?** | **५८** |
| | फॉरवर्ड कॉन्ट्रॅक्ट, इंडेक्स फ्यूचर कॉन्ट्रॅक्ट, इंडेक्स ऑप्शन कॉन्ट्रॅक्ट | ५९ |
| | लॉन्ग कॉल ऑप्शन आणि शॉर्ट कॉल ऑप्शन विषयक रणनीति | ६१ |
| | लॉन्ग पुट ऑप्शन आणि शॉर्ट पुट ऑप्शन विषयक रणनीति | ६३ |
| | वायदे बाजार कधी कधी धोकाही देतो | ६४ |
| | सेबीला मिळालेल्या नवीन अधिकारामुळे फसवणूकीच्या खटल्यांना गती मिळणार | ६५ |
| | हवाला (स्पेक्यूलेशन) अंदाज बांधून व्यवहार करणे | ६५ |
| | कव्हर्ड कॉल स्ट्रॅटेजी | ६६ |
| **प्रकरण ६** | **झटपट पैसे कमावून देणारे शेअर्स कसे ओळखाल** | **६८** |
| | गुंतवणुकीपूर्वी कंपनीच्या प्रगतीचे विश्लेषन कसे करावे | ६८ |
| | फंडामेंटल आणि टेक्निकल विश्लेषन म्हणजे काय? | ६९ |
| | चांगल्या कंपनीमध्ये गुंतवणूक करावी | ६९ |
| | प्रति शेअर उत्पन्न आणि पीई रेशिओ कसा कॅलक्यूलेट करतात | ७० |
| | एबिटडा कव्हरेज रेशिओ कसा कॅलक्यूलेट करतात | ७२ |
| | शेअर खरेदी विक्रीवर निव्वळ नफा उदाहरणासह काढा | ७५ |
| **प्रकरण ७** | **शेअर्सचे तांत्रिक विश्लेषण** | **७६** |
| | बाजार भाव हा ठराविक दिशेने वाढतो किंवा कमी होतो | ७७ |
| | तांत्रिक विश्लेषण आणि मुलभूत विश्लेषण मधील फरक | ७८ |
| | विविध ट्रेंड्स आणि त्यांची उपयुक्तता | ८० |
| | आधार आणि विरोध पातळी Support And Resistance level | ८४ |
| | व्हॉल्यूम किंवा उलाढाल The Importance Of Volume | ८७ |
| | चार्ट म्हणजे काय? What Is A Chart? | ८८ |
| | चार्टस्‌चे प्रकार Chart Types | ९० |
| | कॅन्डलस्टिक चार्ट the candlestick chart आणि पॉईंट अँड फिगर चार्ट | ९१ |
| | चार्ट पॅटर्न्स Chart Patterns आणि हेड अँड शोल्डर्स Head and Shoulders | ९२ |
| | कप अँड हॅन्डल Cup and Handle आणि डबल टॉप्स अँड बॉटम्स Double Tops and Bottoms | ९३ |
| | त्रिकोणाकृती पॅटर्न्स Triangles patterns | ९४ |
| | फ्लॅग आणि पेनंट्स Flag and Pennant आणि वेज चार्ट पॅटर्न The wedge chart pattern | ९५ |
| | गॅप्स Gaps आणि ट्रीपल टॉप्स आणि बॉटम्स Triple Tops and Bottoms | ९६ |
| | राऊंडींग बॉटम Rounding Bottom आणि मुव्हींग ॲव्हरेजेस Moving Averages | ९७ |


**इंडेक्सचा राहीलेला भाग पान नं. ६ वर पहा.**

# प्रस्तावना

दोन वर्षापूर्वी दिशोत्तमा प्रकाशनची मुहुर्तमेढ रविंद्र पाटील आणि सौ.सुरेखा पाटील ह्यांनी रोवली आणि पाहाता पाहाता हे रोपटे गगणाला भिडू पहात आहे. कारण आज **“शेअर मार्केट म्हणजेच भरपूर पैसा’’** हे पुस्तक वाचकांच्या सेवेत सादर करित आहोत.

“अर्थ’’हा पहिला पुरुषार्थ मानला जातो, कारण अर्थाशिवाय अस्तित्व नाही, अस्तित्वाशिवाय उन्नती नाही, उन्नतीखेरीज जीवनाचे सार्थक होणार नाही. काम, धर्म आणि मोक्ष या पुरुषार्थातून व्यक्तीला सुख, शांती, समाधान, तृप्ती, वैभव मिळते. पण अर्थ कमावण्याकरता सतत कष्ट घ्यावे लागतात. अर्थ अथवा पैसा हा मानवाच्या विकासातील एक महत्त्वावा घटक आहे. पैसा मिळवण्यासाठी प्रत्येक जण आपआपल्या परीने मेहनत करीत असतो. प्रत्येकाच्या मेहनतीचे स्वरुप वेगवेगळे असले तरी त्यातून पैसा मिळवून भौतिक सुख सुविधा प्राप्त करणे हा एकमात्र हेतु असतो. कमीत कमी गुंतवणूकीत, कमीत कमी वेळेत जास्त पैसा कमवायचा आहे. पण योग्य नियोजन करुन व स्वतःच्या ज्ञानाचा उपयोग करुन कमीत कमी भांडवलात, कमीत कमी काळात श्रीमंत होता येते. तो व्यवसाय आहे शेअर मार्केट. शेअर्स खरेदी विक्रीचे व्यवहार कोणीही करु शकतो. स्त्री, पुरुष, जात धर्म, आरक्षण, वय, कौशल्य, शिक्षण अशा कोणत्याही अटी नाहीत. शारीरिक दृष्ट्या अपंग असणा-या व्यक्तीसुध्दा शेअर ट्रेडिंग करु शकतात. गृहिणी, विद्यार्थी,स्वेच्छा निवृत्ती घेतलेले निवृत्त झालेले जेष्ठ नागरिक हे सर्व शेअर ट्रेडिंग करु शकतात.

घरातून, घराबाहेरुन, ऑफिसमधून, प्रवासातून, परदेशातून मोबाईलच्या सहाय्याने शेअर्स खरेदी विक्रीचे व्यवहार करता येतात. गुंतवणूकीला कमाल किंवा किमान रकमेची मर्यादा नाही. वयाची अट नाही. कळत्या सवरत्या वयाच्या माणसापासून अगदी जेष्ठ नागरिकांपर्यंत कुणीही व्यवहार करु शकतो. व्यवहार सुरु करण्यासाठी कोणताही परवाना (लायसन) लागत नाही. चोरी अतिक्रमणाची भिती नाही. पाऊस पाणी दुष्काळ ह्याचा परिणाम होत नाही. कोणाला भाडे, पगार द्यायचा नाही. जाहीरात करायची नाही. कॉम्प्युटर, मोबाईलचे ज्ञान असेल तर ऑन लाईन ट्रेडिंग करा व कॉम्प्युटर, मोबाईलचे ज्ञान नसेल तर ऑफ लाईन ट्रेडिंग करा. सर्व फायदेच फायदे.

अमेरिकेत बिल गेट्स नंतर सर्वात धनाढ्य माणूस कोणी असेल तर तो आहे “वॉरेन बर्फेट’’शेअर्स गुंतवणूकीच्या क्षेत्रात त्यांने प्रचंड पैसा कमावला. बिल गेट्सने ऑगष्ट २०१०मध्ये अमेरिकेत एक सेवाभावी संस्था स्थापन केली होती. ह्या संस्थेला “वॉरेन बर्फेट’’ह्यांनी शेअर्स गुंतवणूकीच्या क्षेत्रातून कमावलेल्या संपत्तीचा ९० टक्के वाटा दान केला व आपली तिजोरी रिकामी केली. पण ते स्वस्थ बसले नाही. आणखी नवनवीन आयडिया जसे तांत्रिक विश्लेषण आणि मुलभूत विश्लेषणचा वापर करत व्यवहार सुरु ठेवला आणि पाहाता पाहाता शेअर मार्केटमधून प्रचंड पैसा कमावून तो अमेरिकेत परत दोन नंबरचा श्रीमंत झाला.

भारतातही शेअर मार्केटचा फिवर दिवसेंदिवस वाढत आहे.ह्याचे उदाहरण म्हणजे दि.११-११-२०१५ दिवाळीचे दिवशी 'Muhurat Trading' मुहुर्त ट्रेडिंगसाठी शेअर मार्केट संध्याकाळी ५.४५ ते ६.४५ ह्याकाळात सुरु होते. ह्या एका तासात बीएसई संसेक्स १२३.६९ अंक वाढून तो २५,८६७ वर स्थिरावला आणि एनएसई निफ्टी ४१.६५ अंक वाढून तो ७,८२५ वर स्थिरावला. ह्याउलट ९९.९ आणि ९९.५ प्युअरिटीचे सोन्याचा भाव फक्त रु.१५ ने वाढून तो अनुक्रमे रु.२६,२५० आणि २६,१०० भाव प्रति १० ग्रॅम वर स्थिरावला तसेच चादी फक्त रु. २५ ने वाढून रु. ३४,९०० भाव प्रति किलो वर स्थिरावली. पूर्वीच्या अनेक दिवाळीच्या तुलनेत ह्या दिवाळीला सोन्याचांदीची खरेदी खूपच कमी होती आणि त्यामानाने शेअर्स खरेदी खूपच वाढलेली आढळली.

ह्याचा अर्थ असा आहे कि भारतातील ६० कोटी युवा पिढी जी ४० वर्षे वयापेक्षा लहान आहे त्यांचे सोन्याचांदीचे आकर्षण कमी होत आहे. त्यामुळे भविष्यात सोन्याचांदीपेक्षा शेअर मार्केटमधील गुंतवणूक फायदेशीर ठरणार आहे. ह्या दिवाळीत सर्व बातम्या खराब आल्या जसे बिहार निकालात एनडीएची हार, क्रुडचा साठी चौपट वाढला त्यामुळे त्याचे भाव कमी झाले, देशात कोरडा दुष्काळ पडला, डॉलर निर्देशांक मजबूत झाला पर्यायाने रुपयाची किंमत कमी झाली, फेड व्याजाचे दर वाढवणार ही टांगती तलवार मानेवर आहेच शिवाय चीन आणि अमेरिकेत अंशतः मंदी हे सर्व असतांनाही लोकांचा उत्साह आणखी वाढला व शेअर्स खरेदी प्रचंड प्रमाणात वाढलेली आढळली.

खंडप्राय देशाचे आर्थिक धोरण सहजासहजी बदलता येत नाही. पण हे खरे आहे कि पूर्वी जे आर्थिक धोरण सुस्त व मरगळल्यासारखे झाले होते. निश्चित धोरण नसल्याने व विशिष्ठ लोकांची मर्जी सांभाळली जात असल्याने आर्थिक

मरगळल्यासारखे झाले होते. निश्चित धोरण नसल्याने व विशिष्ठ लोकांची मर्जी सांभाळली जात असल्याने आर्थिक परिस्थिती घरंगळत चालली होती. गेल्या दिड वर्षात एकही भ्रष्टाचार किंवा आर्थिक घोटाळा झाला नाही व पूढे सुध्दा होणार नाही. साहजिकच हा पैसा देशाच्या विकासासाठी वापरला जाईल. नवीन सरकार आल्यानंतर खूपच सुधारणा होत आहे. जुन्या नियोजन मंडळाचे विसर्जन करुन करोडो रुपयांची बचत केली आणि नवीन निती आयोगाची स्थापना केली. ब्लॅक मनीवर खूपच कडक कायदा केला गेला. आता रु.२०,००० किंवा त्यापेक्षा मोठे आर्थिक व्यवहार कॅशमध्ये करण्यावर कडक बंदी आणली गेली. कोळसा खाणींची जाहीर निलामी करुन अब्जो रुपये सरकारी तिजोरित जमा झालेत. मेक इन इंडिया, स्वच्छ भारत अभियान, अफोर्डेबल हाउसिंग स्किम, स्किल इंडिया अभियान, सर्व शिक्षा अभियान, स्मार्ट सिटी योजना, बुलेट ट्रेन योजना ह्या व अशा अनेक योजना येत्या काळात वेगाने धाव घेणार आहेत. गुड्स अँड सर्विस टॅक्स GST आणि भुमी अधिग्रहण बिल पास झाल्यास परदेशातील प्रचंड पैसा भारतात गुंतवला जाणार आहे.

हे सर्व सांगण्याचा एकच हेतु असा आहे कि भविष्यात प्रचंड प्रमाणात भारतीय व्यापार गती घेणार आहे त्यामुळे शेअर मार्केटचा सेन्सेक्स येत्या एक वर्षात ३०,०००चे पूढे आणि निफ्टी १०,०००चे पुढे जाणारच आहे. माझे असे मत आहे कि शेअर मार्केटमधील गुंतवणूकीवर वार्षीक २० ते २५ टक्के टॅक्स फ्री उत्पन्न सहज मिळू शकते. **त्यामुळे शेअर मार्केटला अच्छे दिन येणारच यात शंका नाही. विरोधी कांहीही म्हणोत आपण शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक वाढवावी.**

शेअर मार्केट ही खजिन्याची चाबी आहे ह्यात कांहीच शंका नाही. पण त्या व्यवसायातील बारीक बारीक गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी हे पुस्तक काळजीपूर्वक वाचा. ह्यात कांही चुका आढळल्यास त्याबाबत आम्हाला माफ करावे.

Subhash H. Pandey
**M.Com. MBA, DTL**
**Mob:- 9175882117**

Ravindra K.Patil
**B.Com. GDC & A**
**Mob:-7385690447**

**इंडेक्सचा राहीलेला भाग पान नं. ४ वरुन**

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण ८** | **म्युच्युअल फंड** | **१००** |
| | म्युच्युअल फंडचे कार्य कसे होते | १०० |
| | Net Asset Value (NAV) एनएव्ही कसा कॅलक्यूलेट होतो | १०१ |
| | भारतात म्युच्युअल फंड योजनांचा इतिहास | १०१ |
| | म्युच्युअल फंडात तीन प्रकाराने गुंतवणूक करता येते | १०२ |
| | म्युच्युअल फंडाचे प्रकार | १०२ |
| | ईटीएफ म्हणजे काय? | १०४ |
| | १ नोव्हेंबर २०१५ ला भारतातील सेक्टरवाईज प्रमुख म्युच्यूअल फंड्स | १०५ |
| **प्रकरण ९** | **शेअर्स ट्रेडिंगमधील संक्षिप्त शब्द** Abbreviation in Shares Trading | **१०६** |

# प्रकरण नं. १

# गुंतवणूक म्हणजे काय? What is Investment?

## शेअर बाजार एक ओळख Introduction of the Share market

मनात धंदा करण्याची इच्छा व त्या अनुषंगाने जास्तीत जास्त अद्ययावत माहिती आणि त्या महितीचे योग्य विश्लेषन करण्याची सवय जर मनाला असेल तर कुठलाही धंदा कुठल्याही माणसाला अशक्य नाही. मग ते कुठल्याही वस्तुचे ट्रेडिंग असो अथवा जास्त पैसे मिळवून देणारा, क्षणा क्षणाला मिळकतीची संधी उपलब्ध करुन देणारा शेअर बाजार असो.

दुर्दैवाने शेअर बाजार म्हणजे सट्टा बाजार, पैसे बुडणार, जुगारीपणा, अनैतिक धंदा, ईभ्रतीचा धंदा नाही वगैरे अनेक गैर समज पूर्वीच्या पिढीने आजच्या पिढीसमोर निर्माण केलेले आहेत. तसे पाहिले तर पूर्वीच्या पिढीचा हा दोष नसून मध्यम वर्गीयांची आर्थिक असुरक्षततेची भावना हे कारण आहे. सर्व सामांन्याकडे श्रीमतांसारखी गडगंज संपत्ती नसते. आहे त्याच तुटपुंज्या गंगाजळीत सर्व सोंग वठवायची असतात. त्यांना आपल्या गंगाजळीत वाढ करायला नक्कीच आवडतं.

आपण रोजच्या जीवनामध्ये शेअर मार्केट, सेबी Securities and Exchange Board of India (SEBI), सेन्सेक्स, म्यूच्युअल फंड Mutual Funds, बॉण्ड्स Securities व डिबेंचर्स Debentures ईटीएफ बाबत वाचत असतो, पाहत असतो त्याची माहीती येथे देण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.

कधी कधी वर्तमान पत्रात आपण वाचतो कि आज शेअर बाजार कोसळला तर कधी कधी वाचतो कि शेअर बाजार वधारला. शेअर ट्रेडिंग करणा-याला शेअर बाजार कोसळणे असू द्या किंवा शेअर बाजार वधारणे असू द्या दोनही परिस्थितीत त्याच्या दोन्ही हातात लाडू असतात. कारण शेअर बाजार कोसळला तर तो शेअर्स आणखी खरेदी करतो आणि शेअर बाजार वधारला तर तो शेअर्स विकून नफा कमवतो.

## गुंतवणूक करणे फारच महत्वाचे आहे Importance of the Investment

गुंतवणूक करणे ही आजच्या काळातील अतिशय आवश्यक बाब बनलेली आहे. गुंतवणूक करणे हे किती फायद्याचे आहे हे तुम्हाला वेगळे सांगण्याची गरज नाही. गुंतवणूक ही भविष्यकालीन परिस्थितीसाठी संकट समयी अतिशय फायदेशीर ठरते. वाढती महागाई आणि मर्यादित इनकम असल्यामुळे बचत करणे फार अवघड होत आहे तरीही बचतीचे महत्व नाकारल्या जाऊ शकत नाही. मी तुम्हाला खात्रीने सांगतो कि गुंतवणूक विषयक सारी माहिती, ज्ञान व गुंतवणूक शास्त्र व गुंतवणूकीची कला मी तुम्हाला येथे समजावून सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. ज्ञान हिच मुळी एक ताकद आहे. पैसा हा हुषारीनेच गुंतवला पाहिजे तरच गुंतवणूकीची खरी ताकद समजू शकते. अनेक गुंतवणूकदारांना प्रश्न पडत असतो की, आपल्याकडे असलेली रक्कम कुठे गुंतवावी व ती कशासाठी गुंतवावी? गुंतवणुकीसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. अभ्यासपूर्ण विचार करुन गुंतवणूक ही टप्याटप्याने केली पाहिजे. शेअरबाजार, म्युच्युअल फंड, बॉण्डस् वस्तु बाजार Commodity Market रियल इस्टेट, युनिट लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसी(युलिप), एक्सचेंज ट्रेडेड फंड्स (ईटीएफ) इत्यादींमध्ये थोडी थोडी गुंतवणूक केल्यास भविष्यातील त्याचा परतावा फायदेशीर ठरु शकतो.

The money you earn is partly spent and the rest saved for meeting future expenses. Instead of keeping the savings idle you may like to use savings in order to get return on it in the future.This is called Investment.

गुंतवणूकीची कला जर एखाद्याला खरोखरच आत्मसात करावयाची असेल तर त्यासाठी तुम्हाला वेळ हा द्यावाच

| प्रकरण नं. २ | भारतीय शेअर बाजार<br>**The Indian Share Market** |
|---|---|

## शेअर बाजार म्हणजे काय? Equity or Stock Market

शेअर बाजार म्हणजे कंपनी आणि छोटे मोठे गुंतवणूकदार ह्यामधील दुवा होय. भारतात बाँबे स्टॉक एक्सचेंज Bombay Stock Exchange (BSE) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज National Stock Exchange (NSE) असे दोन प्रमुख शेअर बाजार आहेत. ह्या दोनही शेअर बाजारामध्ये ८०००पेक्षा जास्त कंपन्या लिस्टेड आहेत. ह्या दोनही संस्थाना शेअरच्या खरेदी विक्रीची जवाबदारी कायद्याच्या चौकटीत राहून पुर्ण करावी लागते. ह्याच्या मदतीमुळे गुंतवणूकदाराला शेअर खरेदी करतांना विक्रेता कंपनी शोधावी लागत नाही तसेच शेअर विकतांना खरेदीदार कंपनी सुध्दा शोधावी लागत नाही. कॉम्प्यूटर आणि इंटरनेटच्या मदतीमुळे खरेदी किंवा विक्रीचा व्यवहार २ ते ३ मिनिटात पूर्ण करता येतो.

## शेअर किंवा स्टॉक म्हणजे काय? What is a Equity or Share ?

स्टॉक म्हणजे एखाद्या कंपनीमध्ये तुमची हिस्सेदारी, समजा तुमच्या कडे रिलायन्स कंपनीचे १०० शेयर्स आहेत तेंव्हा तेवढ्या शेयर्सच्या प्रमाणात तुम्ही कंपनीचे मालक आहात, जर कंपनीला फायदा झाला तर त्या प्रमाणात आपणास कंपनी कडून डिव्हीडंड Dividend मिळतो. इनकमटॅक्स ॲक्ट १९६१च्या कलम १० (३४) अनुसार लिस्टेड कंपनीकडून मिळालेला डिव्हीडंड हा **शेअर धारकाच्या हातात १००टक्के टॅक्स फ्री असतो.** ह्याच स्टॉकला शेअर्स अथवा इक्विटी असे सुध्दा म्हणतात.

इक्विटी म्हणजे इक्वल म्हणजे समान भाग. समजा एखादे टरबूज आहे ते एवढे मोठे असते कि सर्व सामान्य माणूस विचार करतो कि एवढे मोठे टरबूज विकत घेणे म्हणजे पैसे जास्त लागणार शिवाय मी खाऊन खाऊन किती खाणार पर्यायाने वेस्ट जाणार.

पण विक्रेत्याने त्याचे लहान लहान तुकडे करुन विक्रीस ठेवले तर त्याची विक्री वाढेल व घेणा-याला सुध्दा ते घेणे परवडेल. कधी कधी तर अशा स्टॉल समोर रांगा पण दिसतात.

तेच तत्व येथे पण लागू होते. सर्व सामान्य माणूस एखादी कंपनी विकत घेऊ शकत नाही. म्हणून ती कंपनी कायद्याच्या चौकटीत राहून आपल्या मालकी हक्काचे लहान लहान तुकडे करते व ते बाजारात विकते यालाच शेअर्स अथवा इक्विटी असे म्हणतात. जी व्यक्ति जेवढे शेअर्स अथवा इक्विटी विकत घेईल त्या प्रमाणात त्याला डिव्हिडंड रुपाने नफ्याचा हिस्सा मिळतो.

## शेअर धारकाचे वैधानिक अधिकार Statutory Powers

कंपनी ॲक्ट १९५६ प्रमाणे शेअर धारकाचा कंपनीच्या कोणत्याही निर्णयाशी, कार्यपध्दतीशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबध नसतो. म्हणून त्यांचा कायदेशीर अधिकार आणि जवाबदारी मर्यादित असते. कंपनी कायद्यात कंपनीचे आणि शेअर धारकाचे वेगवेगळे स्थान असते. शेअर धारक जरी कंपनीचा मालक असला तरी कंपनी (शेअर धारक नव्हे) इतर व्यवसायिक करार करु शकते, मालमत्तेची खरेदी विक्री करु शकते, कर्ज घेऊ शकते. पण जर कंपनीचे कांही बरे वाइट झाले तर त्याची जवाबदारी शेअर धारकावर नसते. म्हणून गुंतवणूकदारांनी घाबरुन जाऊ नये.

**सुचनाः- स्टॉक एक्सचेंजकडून शेअर धारकाला मिळणारे अधिकार पान नं. १८ वर पहा**

## स्टॉक एक्सचेंज म्हणजे काय? What is a Stock Exchange

वर संगितल्याप्रमाणे शेअर बाजार म्हणजेच स्टॉक एक्सचेंज किंवा जेथे लिस्टेड कंपन्यांच्या शेअर्सची खरेदी विक्री होते त्याला स्टॉक एक्सचेंज असे म्हणतात. भारतात स्टॉक एक्सचेंजची सुरुवात 1875 मध्ये झाली, सुरुवातीला ह्याला NativeShare

| प्रकरण नं. ३ | # डिमॅट अकाउंट<br>DEMAT Account |
|---|---|

## डिमटेरियलायझेशन म्हणजे काय? What is Dematerialization or “Demat”

डिमटेरियलायझेशन म्हणजे शेअरची खरेदी प्रत्यक्ष कागदी स्वरुपात न करता इलेक्ट्रॉनिक स्वरुपात करणे होय. इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील शेअर्स डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे जशाच तसे राहतात. त्यात कसलाही धोका नसतो. कारण आपल्याकडे शेअर खरेदीचा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सने इशु केलेला कॉन्ट्रक्ट नोट असतो. तो सुध्दा इलेक्ट्रॉनिक स्वरुपात असतो. सुरक्षिततेचा उपाय म्हणून त्याची पिडीएफ़ स्वरुपातील प्रिंटआउट काढून आपल्याकडे ठेवावी.

Dematerialization or “Demat” is a process whereby your securities like shares,debentures etc, are converted into electronic data and stored in computers by a *Depository Participant* (DP).

It is safe, secure and convenient buying, selling and transacting stocks without suffering endless paper-work and delays. You can convert your securities to electronic format with a Demat Account.

## डिपॉझिटरी म्हणजे काय? What is Depository

डिपॉझिटरीला फायनान्शियल सिक्यूरिटीज (जसे शेअर्स,डिबेंचर्स, बॉंड्स इत्यादी) इलेक्ट्रॉनिक स्वरुपात सांभाळून ठेवणारी बॅंक असे सुध्दा म्हटले जाते. डिपॉझिटरी बॅंके प्रमाणेच कार्य करतो फक्त बॅंकेत पैशाचे व्यवहार होतात येथे तुमच्या शेअर्सचे व्यवहार होतात. भारतात एनएसडिल National Securities Depository Limited (NSDL) आणि सिडिएसएल Central Depository Services Ltd (CDSL) ह्या दोन संस्था डिपॉझिटरी बॅंकेचे कार्य करतात. ज्या व्यक्तिला शेअर्स ट्रेडिंग सुरु करावयाचे आहे त्याने सर्व प्रथम डिपॉझिटरीकडे डिमॅट अकाउंट ओपन करावे.

## डिपॉझिटरी पार्टीसिपंट (डिपी) म्हणजे काय? Depository Participant

भारत हा एवढा मोठा देश आहे कि प्रत्येकाचे शेअर्स, डिबेंचर्स, बॉंड्स इत्यादीचे व्यवहार डायरेक्ट बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (BSE), नॅशनल स्टॉक एक्सचेंज (NSE)), एनएसडिएल National Securities Depository Limited (NSDL) किंवा सिडिएसएल Central Depository Services Limited (CDSL) कडून करु शकत नाही व सामान्य माणूस आपल्या समस्या सुध्दा तेथ पर्यंत पोहोचवू शकत नाही म्हणून सेबीने खालच्या स्तरावर शेअर्स, डिबेंचर्स, बॉंड्स इत्यादीचे व्यवहार करण्याची परवानगी बॅंका, ब्रोकर्स, कस्टोडियन्स Custodian इत्यादींना दिलेली आहे.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास बाजारातील सर्वसामान्य गुंतवणूकदार ज्या मध्यस्थां मार्फत डिपॉझिटरी सेवा विकत घेतात त्यांना डिपॉझिटरी पार्टीसिपंट (डिपी) असे म्हणतात. सर्वसामान्य गुंतवणूकदाराला शेअर्स, डिबेंचर्स, बॉंड्स इत्यादीचे व्यवहार कमीत कमी खर्चात करता येतात. अशा प्रकारच्या व्यवहारामध्ये गैर प्रकाराला आळा बसावा, सर्वसामान्य गुंतवणूकदाराच्या हिताचे रक्षण व्हावे ह्या हेतुने त्यांच्यावर सेबी Securities and Exchange Board of India (SEBI) चे कडक निर्बंध असतात. डिपॉझिटरी पार्टीसिपंट (डिपी) अशा प्रकारच्या व्यवहारांवर मग शेअर्सची खरेदी असो किंवा विक्री असो किरकोळ चार्जेस जार्ज करतात. जसे डिपीचे ब्रोकरेज ०.५ ते १ टक्के त्यावर १४ टक्के सर्विस टॅक्स अधिक स्टॅम्प ड्यूटी अधिक ०.०१ टक्के एसटीटी (Securities Transaction Tax) अधिक इतर खर्च. हे सर्व मिळून १.५ टक्के ते २ टक्के खर्च होतो.

सुचनाः- एसटीटी (Securities Transaction Tax) हा इनकम टॅक्सचाच भाग आहे पण टीडिएसचा जसा रिबेट, डिडक्शन मिळतो तसा एसटीटीचा मिळत नाही. बरेच लोक एसटीटी वजा करुन इनकम टॅक्स रिटर्न भरतात ते चूक आहे.

| प्रकरण नं. ४ | शेअरबाजार,सेन्सेक्स आणि निफ्टी<br>**Share Market, Sensex and Nifty** |
|---|---|

## निर्देशांक (इंडेक्स) म्हणजे काय? What is Index

भारतीय शेअर बाजारात इंडेक्स म्हणजे शेअर बाजारातील विशिष्ठ प्रकारच्या शेअर्सच्या बाजारभावात होणा-या बदलाची नोंद ठेवणारी यंत्रणा होय. ह्यावरुन शेअर बाजारातील indication of market trends तेजी अथवा मंदीची दशा व दिशा समजण्यासाठी मदत होते. जेव्हा ह्या सर्व शेअर्समधून अधिकांश शेअर्सचा कल तेजीकडे असतो तेंव्हा बाजारात तेजी आहे असे समजावे ह्याउलट अधिकांश शेअर्सचा कल जर मंदीकडे असेल तेंव्हा बाजारात मंदी आहे असे समजावे . आता देशात दोन प्रमुख स्टॉक एक्सचेंजेस वेगवेगळे असल्यामुळे त्यांचे इंडेक्ससुध्दा वेगवेगळे आहेत.

बदलत्या काळाच्या ओघात नवनवीन कंपन्याची संख्या वाढते आहे हे लक्षात घेऊन बीएसईने सेक्टोरल निर्देशांक तयार केला होता. १९९९मध्ये पाच सेक्टोरल निर्देशांकानी सुरुवात केली. दि.२५-०७-२००१ पासून पीएसयु इंडेक्स, डॉलेक्स-३० DOLLEX-30 आणि प्रथमच बीएसई टेक इंडेक्सचा प्रारंभ केला. एक्सचेंजमार्फत शेअर निर्देशांका व्यतिरिक्त त्या त्या निर्देशांकाच्या प्रति शेअरची किंमत, बुक व्हॅल्यू रेशिओ आणि डिव्हिडंड यिल्डच्या टक्केवारीची माहिती दिली जात आहे. ट्रेडिंग चालु असतांना बीएसई तर्फे दर १५ सेकंदाला निर्देशांक अपटुडेट केला जातो. एक्सचेंजच्या “इंडेक्स कमिटी” मार्फत बीएसई निर्देशांकाचे वेळोवेळी संशोधन केले जाते. एक्सचेंजवर इतरही सेक्टोरल निर्देशांक आहेत जसे टेक्नॉलॉजी, पीएसयु, ऑटो, बॅंकेक्स, कॅपिटल गुड्स, एफएमसीजी इत्यादी.

बीएसईचा जो मुख्य इंडेक्स आहे त्याला सेन्सेक्स SENSEX-(or SENSitve indEX) आणि एनएसईचा जो इंडेक्स आहे त्याला निफ्टी असे म्हणतात. (सुचनाः- वेगवेगळ्या प्रकारच्या इंडेक्सची माहिती ह्याच प्रकरणाच्या पुढे पहा)

## सेन्सेक्स SENSEX-(or SENSitve indEX)

वर सांगितल्याप्रमाणे बीएसई Bombay stock exchange of India चा जो इंडेक्स आहे त्याला सेन्सेक्स असे म्हणतात. हा इंडेक्स दि. ०१-०१-१९८६ पासून सुरु करण्यात आला आहे. ह्यामध्ये बाजारातील प्रमुख ३० कंपन्याचा समावेश असतो. ह्या बाजारातील प्रमुख ३० कंपन्याच्या बाजार भावाप्रमाणे हा इंडेक्स ठरत असतो. ह्यात प्रमुख 30 कंपन्याची निवड कॅपिटलाइझेशन - वेटेज मेथडॉलाजीच्या (ह्याचा अर्थ पुढील पानावर पहा) निकषांवर केली जाते. हा इंडेक्स जेवढा जास्त तेवढे शेअर मार्केट आणि पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था चांगली आहे असे समजावे.

## सेन्सेक्सचा बेस आणि इतिहास What is “SENSEX” and it’s history

बाजारातील प्रमुख ३० कंपन्याच्या बाजार भावाप्रमाणे हा इंडेक्स ठरत असतो. हा सेन्सेक्स दि ०१-०४-१९७९ रोजी सुरु झाला. ह्या सेन्सेक्सचे आधारभूत वर्ष हे १९७८-७९ आणि सुरुवातीला १०० पॉईंट धरल्या गेले. तेंव्हापासून तो कमी जास्त होउन २००६मध्ये जवळजवळ २५,००० पर्यंत पोहोचला होता. त्यानंतर जागतीक आर्थिक मंदीचा फटका जगातील सर्व देशांना बसला. २००७ मध्ये सेन्सेक्स ८,००० पॉईंट पर्यंत घसरला होता. २०१४ पर्यंत हा परत २३,००० पर्यंत पोहोचला पण मोदी सरकार आल्या पासून त्यांनी विकास कामांचा सपाटा लावला त्यामुळे सेन्सेक्स २८००० पर्यंत पोहोचला. जर २०१५-१६मध्ये जीएसटी आणि भुमी अधिग्रहण बील पास झाले तर सेन्सेक्स ४०,०००पर्यंत उसळी मारु शकतो.

दि. २५-०७-२००१ पासून बीएसई Bombay stock exchange ने DOLLEX-30 नावाचा इंडेक्स सुरु केला होता. पण आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे नाव उज्वल व्हावे म्हणून १९-०२-२०१३ रोजी बीएसई Bombay stock exchange of India आणि Dow Jones Indices (S&P DJI) ह्या दोन संस्थामध्ये संयुक्त करार करण्यात आलाआणि तेंव्हा पासून S&P BSE SENSEX हे नवीन नाव ह्या इंडेक्सला देण्यात आले. On February 19, 2013,

| प्रकरण नं ५ | डेरिव्हेटिव्हज मार्केट (वायदे बाजार) म्हणजे काय? Understanding Derivatives and what they mean |
|---|---|

९ जुन २००० ही भारतीय शेअर बाजारासाठी एक अविस्मरणीय तारीख मानली जाते. ह्याच दिवशी बीएसई Bombay Stock Exchange of India ने डेरिव्हेटिव्हज ट्रेडिंगचा शुभारंभ केला. खरं तर डेरिव्हेटिव्हजमध्ये फ्यूचर्स आणि ऑप्शन्सचा समावेश होतो, परंतु सुरुवात मात्र फ्यूचर्स कॉन्ट्रक्टने झाली. बाजारात सहभागी होणा-यांसाठी जोखीम नियंत्रण किंवा संचालन करण्याची सुविधा सुलभ व्हावी किंवा हेजिंग करण्याची सोय व्हावी या हेतुने भारतीय शेअर बाजारात डेरिव्हेटिव्हज ट्रेडिंगची सुरुवात करण्यात आली.

१६ सप्टेंबर २००८ हा भारतीय भांडवली बाजाराच्या Indian Capital Market of India इतिहासात एक ऐतीहासिक दिवस होता कारण यादिवशी देशात प्रथमच साप्ताहिक ऑप्शनचा प्रारंभ करण्यात आला. स्थानिक तसंच आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही एफ अँड ओ (फ्यूचर्स आणि ऑप्शन्स) बाजारामध्ये सर्वासाठी हे एक नवीनच उत्पादन होते. खूप नावाजलेल्या कंपन्यासाठी एफ अँड ओचा उपयोग करुन साप्ताहिक ऑप्शन सुरु झाले.

## डेरिव्हेटिव्हज म्हणजे काय? What is Derivatives?

डेरिव्हेटिव्हज हा एक प्रकारचा वायदे बाजारच आहे. या बाजारात देखील भविष्यात शेअर्सचा भाव वाढेल या अपेक्षेने आतापासूनच शेअर्स विकण्याचं कॉन्ट्रॅक्ट केले जाते. हे कॉन्ट्रॅक्ट कांही ठरावीक मान्यताप्राप्त दलालांच्या मार्फत केले जातात. तुम्हाला जर वाटत असेल की भविष्यात एखाद्या शेअर्सचे भाव वाढतील आणि आपण जर तसे कॉन्ट्रॅक्ट खरेदी करु इच्छीता ज्यामध्ये या कॉन्ट्रॅक्टचा कालावधी पूर्ण झाल्यावर “ठराविक भाव’’झाल्यावर “ठराविक शेअर्स’’ घेईन असं निश्चितपणे सांगावे लागते. जर किंमती वाढल्या आणि आपला अंदाज खरा ठरला तर आपण कॉन्ट्रॅक्ट खरेदी करण्यासाठी चुकती केलेली रक्कम आणि कॉन्ट्रॅक्ट पूर्ण झाल्यावर त्या शेअर्सची किंमत या दोन्हीच्या किंमतीत जो फरक आढळेल तो आपला नफा असतो.

त्याचप्रमाणे तुम्ही जर तर्क केलात की अमुक शेअरची किंमत खाली येईल आणि तुम्ही असे कॉन्ट्रॅक्ट खरेदी करु पाहता की ज्यात आपण कॉन्ट्रॅक्टच्या मुदतीच्या तारखेला अमुक ठराविक किंमतीला कांही ठराविक संख्येचे शेअर्स विकु असं सांगावे लागते. जर आपला अंदाज योग्य ठरला आणि शेअर्सचे भाव घटले तर कॉन्ट्रॅक्टप्रमाणे दिलेली रक्कम, तसंच संबधीत शेअर्सचा वर्तमान बाजारभाव यां दोघांमधला फरक हा तुमचा लाभ असतो.

ह्याउलट जर आपला तर्क चुकीचा सिध्द झाला म्हणजे शेअर्सचा भाव कमी होण्याऐवजी वाढला तर आपल्याला फक्त कॉन्ट्रॅक्ट खरेदी करतांना दिलेली प्रिमियमची रक्कम विसरावी लागेल. याप्रकारे जर आपण शेअर्स खरेदी करण्याचे कॉन्ट्रॅक्ट खरेदी केले आणि शेअर्सचे भाव वाढण्याऐवजी कमी होऊ लागले तर तुम्ही ते शेअर्स घेण्याऐवजी कॉन्ट्रॅक्ट खरेदी करण्यासाठी दिलेली रक्कम विसरुन जाणे पसंद कराल. खरेदी करणा-याला असा अधिकार देणा-या कॉन्ट्रॅक्टला ऑप्शन असे म्हटले जाते.

डेरिव्हेटिव्हज म्हणजेच वायदे बाजार होय. ह्याचे प्रामुख्याने तीन भाग आहेत ते असे.

## (१) फॉरवर्ड कॉन्ट्रॅक्ट (पुढील तारखेचा करार) Forward Contracts

फॉरवर्ड कॉन्ट्रॅक्ट म्हणजे पुढील तारखेचा करार आजच करणे. ही पध्दत डेरिव्हेटिव्हज म्हणजेच वायदे बाजारातील सर्वात सोपी पध्दत आहे. हा एखाद्या वस्तूच्या खरेदी किंवा विक्रीचा भविष्यात ठरविलेल्या निश्चित दिवशी, ठराविक किमतीला पूर्ण करण्याची हमी देणारा करार होय. ज्या दिवशी हा करार होतो त्या दिवशी प्रत्यक्षात रोख रक्कम स्विकारली जात नाही अथवा पे केली जात नाही. A forward contract is a customized contract between two

# प्रकरण नं. ६ | झटपट पैसे कमावून देणारे शेअर्स कसे ओळखाल
## Criteria to Select Profitable Shares

शेअर होल्डर एखाद्या कंपनीचे जेवढे शेअर्स खरेदी करतो त्या प्रमाणात तो त्या कंपनीचा एक प्रकारे मालकच असतो. कंपनीसाठी शेअर्स विक्री पासून मिळणारे पैसे हे एक प्रकारे व्याज मुक्त कर्ज असते. ह्यासाठी कंपनीला कसलीही मालमत्ता गहाण ठेवावी लागत नाही. पण जर कंपनी बंद झाली तर सर्व देणी दिल्यानंतर राहीलेले पैसे शेअर होल्डर्सना दिले जातात. पण अशा कंपनीचे शेअर्स खरेदी करा जी कंपनी बंद पडणार नाही.

ज्या कंपनीचे व्हॅल्यूएशन जास्त त्या कंपनीच्या शेअर्सचा बाजार भाव जास्त असतो. साधारणतः शेअर्सचा बाजार भाव खालील कारणांवर आधारित असतो.

(१) कंपनीच्या निव्वळ नफ्याचे प्रमाण

(२) निव्वळ नफ्याचा वाढीव दर (Profit to Earning Ratio -- PE Ratio)

(३) कंपनीची बॅलन्सशिट

(४) कंपनीवर असलेले कर्ज आणि कंपनीने जारी केलेल्या शेअर्सचे प्रमाण (Debt Equity Ratio)

(५) कंपनीची रोख आणि रोख तरलता (Cash Flow and Cash Liquidity)

(६) कंपनीने दिलेला प्रति शेअर परतावा (Earning Per Share -- EPS)

(७) कंपनीच्या व्यवहारातील पारदर्शीतता(Company’s Economic Transaction and Transperency)

(८) कंपनीचे नाव, व्यवस्थापण व अनुभव आणि बाजारात असणारी कंपनीची गुडवील (Goodwill of the Company)

(९) कंपनी कोणत्या क्षेत्राशी संबधित आहे ते क्षेत्र सरकारच्या विकासाच्या रडारवर आहे का? (Govt. Focus on Sector)

(१०) कंपनी करित असलेले उत्पादन, बाजारात अलेली मागणी आणि विक्री पश्चात सेवा

(११) कंपनीच्या भविष्यकालीन योजना अशा योजनांना सरकार प्रोत्साहन, टॅक्स हॉलिडे, सबसिडी इत्यादी देते का?

(१२) कंपनीच्या हातात आज असणा-या ऑर्डर्स, रॅामटेरियल, आवश्यक उपलब्ध कुशल अकुशल मॅनपावर

ह्या वरील सर्व बाबींचा कंपनीच्या शेअर्सच्या बाजार भावावर अनुकूल वा प्रतिकूल परिणाम होत असतो. जेंव्हा तुम्ही नवखे गुंतवणूकदार म्हणून या क्षेत्रात पदार्पण करता, तेंव्हा तुम्हाला साहजीकच प्रश्न पडतो कि नक्की कोणत्या कंपनीचे शअर्स खरेदी करावेत? कारण आजच्या घडीला बीएसई आणि एनएसई या दोन प्रमुख बाजारामध्ये जवळजवळ ७००० कंपन्यांची नोंदणी झालेली आहे. एवढ्या कंपन्यांमधून चांगल्या कंपन्यांची निवड करता आली पाहिजे. या क्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी सर्व प्रथम अंगात कणखरपणा जोपासणे सर्वात महत्वाचे आहे. कारण शेअर बाजार अथवा ह्याचा निर्देशांक हा फार भावनाप्रधान मामला आहे.

शेअर बाजारावर अवतीभवती घडणा-या राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम होत असतो. बाजार जरी भावनांच्या हिंदोळ्यावर हेलकावत असला तरी तुम्ही मात्र तुमच्या भावनांवर ताबा मिळवून शांतपणे निर्माण झालेल्या परिस्थितीचे विश्लेषन करुन निर्णय घ्याल तरच तुम्ही बाजारातील चढ उतारांचा फायदा घेऊन यशस्वी होऊ शकाल. अल्प काळामध्ये मिळणा-या यशाने हुरळून जाऊ नका अथवा झालेल्या नुकसानामुळे निराश होऊ नका. आपल्या कडून झालेल्या चुका मोकळ्या मनाने मान्य करुन झालेल्या चुकांचे विश्लेषन लिखीत स्वरुपात करा व भविष्यात ह्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही ह्याची काळजी घ्यावी.

## गुंतवणुकीपूर्वी कंपनीच्या प्रगतीचे विश्लेषन कसे करावे How to analyze the company before investing

ज्या कंपनीचे शेअर्स आपणाला खरेदी करावयाचे आहेत तर खरेदी करण्यापूर्वी खालील बाबी तपासून पहाव्या लागतील.

(१) फडामेंटल आणि टेक्निकल विश्लेषन म्हणजे काय? What is Fundamental and Technical analysis?

(२) चांगल्या कंपनीमध्ये गुंतवणूक करावी Investment in Good Company

(३) कंपनीच्या विक्रीमध्ये होणारी वाढ Increase in Company’s Profitability

(४) कंपनीची बॉटम लाईन ग्रोथ Company’s Bottom Line Growth

| प्रकरण नं. ७ | # शेअर्सचे तांत्रिक विश्लेषण<br>Technical Analysis from A to Z |
|---|---|

## तांत्रिक विश्लेषण परिचय Introduction of Technical analysis

तांत्रिक विश्लेषण Technical analysis आणि मुलभूत विश्लेषण Fundamental analysis हे दोन महत्वाचे घटक एक दुस-याला पूरक आहेत. तांत्रिक विश्लेषण हे मुलभूत विश्लेषणाचे कवच आहे असे म्हणणे वावगे होणार नाही. शेअर बाजारात एखाद्या शेअरचा किंवा निर्देशांकाचा किंवा कमोडिटीचा गुंतवणूकीसाठी अभ्यास करण्यासाठी हे दोनही प्रकारचे विश्लेषण अति आवश्यक आहेत.

मुलभूत विश्लेषण Fundamental analysis करतांना एखाद्या शेअर्सचे मुल्यमापन करण्यासाठी त्या कंपनीची सर्व प्रकारची माहिती मिळवणे आवश्यक असते जसे भांडवल, नफा तोटा, भविष्यातील कंपनीच्या योजना, त्या सेक्टरचे देश विकासातील महत्व, सरकारी धोरणांचा परिणाम, कंपनी जवळ असलेला राखीव निधी, व्यवस्थापन इत्यादी

ह्याउलट तांत्रिक विश्लेषणात Technical analysis मात्र पूर्णपणे वेगळ्या प्रकारचे मुल्यमापन केले जाते. यात वरील कोणत्याही बाबींचा विचार केला जात नाही तर त्या शेअरचा किंवा निर्देशांकाचा किंवा कमोडिटीचा बाजारातील किमतीत झालेल्या चढ उतारांचा आलेख Charts काढून त्याचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास करतांना अनेक साधनांचा Tools वापर केला जातो. बाजारातील मागणी आणि पुरवठा, शेअरच्या आगामी वाटचालीचा अंदाज बांधला जातो. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास तांत्रिक विश्लेषण हे भूतकाळातील किमती व उलाढाल Volume यांच्या आलेखाच्या आधारे अभ्यास करुन बाजाराचा कल Trend किंवा भावना Sentiments ओळखण्याचा आणि त्या आधारे भविष्यातील संभाव्य चढ उतार Patterns ठरविण्याचा प्रयत्न असतो.

आपण जर या तांत्रिक विश्लेषणाचे फायदे आणि मर्यादा ओळखून त्यात उपलब्ध असलेली विविध साधने आणि त्यांचा वापर करण्याचे कौशल्य मिळवले तर आपण नक्कीच एक अधिक चांगले ट्रेडर वा इन्वेस्टर होऊ शकाल व शेअर मार्केटमधून खूप खूप पेसे कमाऊ शकाल.

तांत्रिक विश्लेषण करण्याच्या अनेक पध्दती आहेत. कांही जण आलेखाकृतीचा Chart Patterns अभ्यास करतात तर काहींचा भरवसा विविध चिन्हे वा आंदोलके Indicators and Oscillators यांच्या पासून मिळणा-या सिगनल्सवर Signals असतो तर बरेच जण दोन किंवा तीन साधनांचा Tools एकत्रित वापर करुन अचूकता वाढविण्याचा प्रयत्न करत असतात. कसेही असले तरी तांत्रिक विश्लेषक हा एखाद्या शेअरच्या मुल्याला महत्व न देता भूतकाळातील माहितीवर आधारित अशा त्यांच्या भविष्याचा वेध घेत असतो.

## तांत्रिक विश्लेषणाची मूळ गृहितके The Basic Assumptions

सर्व साधारणपणे तांत्रिक विश्लषणाची मूळ गृहितके The Basic Assumptions खालील तीन प्रकारचे असतात. त्या सर्वांचा विस्तृत अभ्यास करु.

(१) शेअर मार्केट वेगवेगळ्या घटनांनी सारखा बदलत असतो.The Market Discounts Everything
(२) बाजार भाव हा ठराविक दिशेने वाढतो किंवा कमी होतो Price Moves in Trends
(३) शेअर बाजारात घटनांची पुनरावृत्ती घडत असते History Tends To Repeat Itself

### (१) शेअर मार्केट वेगवेगळ्या घटनांनी सारखा बदलत असतो. The Market Discounts Everything

अमेरिकेचे बेन कार्लसन टुम्ब्लर Ben Carlson's Tumblr म्हणत असत “शेअर बाजार हा नेहमी अस्थिर असतो, अन्यथा जोखीम नावाची कोणती गोष्टच अस्तित्वात नसती. कोणत्याच गोष्टीची नेहमी चलती नसते, अन्यथा त्या

# प्रकरण नं. ८

# म्युच्युअल फंड
## Mutual Funds

रोजच्या रोज आपण टीव्ही, इंटरनेट, वर्तमान पत्र इत्यादींमध्ये शेअर मार्केटची बातमी वाचत असतो पहात असतो. योग्य नियोजन केल्यास शेअर मार्केटमध्ये आपण पैसा कमावू शकतो ही बातमी खूप लोकांना मनाला वेड लावून जाते. त्यामुळे प्रत्येकाला शेअर मार्केटमध्ये पैसा गुंतवावा असे वाटते पण एकतर त्यांना वेळ नसतो दुसरे शेअर मार्केट विषयी तांत्रिक विश्लेषण Technical analysis आणि मुलभूत विश्लेषण Fundamental analysis करणे नवख्या गुंतवणूकदाराला शक्य नसते. ह्याशिवाय जास्तीत जास्त लोकं शेअर मार्केटमध्ये एकदम पैसा गुंतवू शकत नाही.

अशा प्रकारच्या गुंतवणूकदारांसाठी म्युच्युअल फंडाची संकल्पना उदयास आली. म्युच्युअल फंड म्हणजे अशी संस्था जी गुंतवणूकदाराकडून थोड्या थोड्या प्रमाणात पैसे जमा करते. हा प्रचंड प्रमाणात जमा झालेला पैसा ह्या संस्था चांगल्या कंपन्यांचे शेअर्समध्ये गुंतवतात. गुंतवणूक खूप मोठी म्हणजे कोटीच्या घरात केली जाते अर्थात मार्केट खाली असतांना किंवा तो पर्टीक्यूलर शेअरचा भाव कमी असतांना खरेदी केली जाते व त्यात १५ ते २० टक्के वाढ झाल्यावर त्याची विक्री केली जाते. खरेदी विक्रीचा वॉल्यूम मोठा असल्यामुळे नफा पण खूप होतो. त्याचे वितरण युनिटच्या रुपात गुंतवणूकदारांना केले जाते.हाच गुंतवणूकदांराचा प्राफिट असतो. पण हा डिव्हिडंडसारखा पे केला जात नाही. तर तो रिइन्व्हेस्ट केला जातो.

इंग्लंडमध्ये या संस्थाना Unit Trust आणि अमेरिकेत Mutual Fund असे म्हणतात. भारतात सर्व प्रथम युटीआय ॲक्टखाली Unit Trust of India (UTI) ची आकाश बहल ह्यांचे अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली. ३० डिसेंबर १९६३ ला संसदेने Unit Trust of India (UTI) ला मान्यता दिली. युनिट ६४ ह्या नावाचा म्युच्युअल फंड भारतात सर्वात आगोदर सुरु केला गेला. शेअर बाजारात १९८७ पर्यंत युटीआयची एकाधिकार शाही होती.

१९८६ मध्ये सरकारी बँकांना आणि १९९३ मध्ये खाजगी बँकाना म्युच्युअल फंड योजना सुरु करण्याची परवानगी देण्यात आली. वर्ष २०१२ पर्यंत ३२ आणि २०१४ पर्यंत ४५ म्युच्युअल फंडची संख्या अस्तित्वात होती.

## म्युच्युअल फंडचे कार्य कसे होते

आपण गुंतवलेला पैसा म्युच्युअल फंड तंज्ञाच्या मदतीने खूप मोठ्या कंपनीमध्ये गुंतवला जातो. असे ध्येय बाळगणारे असंख्य गुंतवणूकदार असतात. आधी सांगितल्याप्रमाणे तुम्ही केलेल्या गुंतवणूकीच्या बदल्यात तुम्हाला युनिट्स दिली जातात. ही गुंतवणूक रुपये म्हणजे त्या दिवसाचे गुंतवणूक मुल्य होय. त्याला Net Asset Value (NAV) असे म्हणतात (ह्याचा फॉर्मूला पुढील पानावर पहा) मग हे पैसे म्युच्युअल फंड कंपनीचा फंड मॅनेजर शेअर्स, डिबेंचर्स किंवा मनी मार्केटच्या वेगवेगळ्या सेक्युरीटीजमध्ये गुंतवतात. त्याला कॉपर्स असे म्हणतात. रोज बाजार बंद झाल्यावर गुंतवणूकीचे मुल्यांकन केले जाते आणि प्रत्येक युनिटचे मुल्य Net Asset Value (NAV) जाहीर केले जाते. अशा प्रकारे म्युच्युअल फंड तुम्हाला तुलनात्मकदृष्ट्या कमी खर्चात मोठमोठ्या कंपनीची अंशीक भागिदारी प्रदान करते.

प्रत्येक म्युच्युअल फंड हाउस त्यांचे फंड व्यवस्थापनेसाठी अनेक फंड मॅनेजर्स व त्यांना सहाय्य करणारी रिसर्च टीम व कमर्शियल एक्सपर्ट्स यांची नेमणूक करतात. जे तुमचा मेहनतीचा पैसा सपाट्याने वृंदिगत करण्यासाठी सतत आर्थिक बाजार पेठेवर लक्ष ठेवून असतात. ते विविध क्षेत्रातील आणि कंपन्यांमधील मार्केट ट्रेंड्स व बाजाराचा भावी कल याचे काटेकोरपणे संशोधन करत असतात. आपले रिसर्च रिपोर्ट संबधित स्कीमचे फंड मॅनेजरला सादर करत असतात त्यानंतर संबधित फंड मॅनेजर त्यासर्वांचा तुलनात्मक अभ्यास करुन गुंतवणूकीचा अंतिम निर्णय घेत असतात. या कमर्शियल एक्सपर्ट्स मुळे गुंतवणूकीचा योग्य निर्णय घेता येत असतो. हेच काम तुम्ही एकटे करु शकत नाही आणि बाजारावर सतत पाळत ठेवणे तुम्हाला शक्य नाही. याच्या अभावामुळे जास्तीत जास्त गफुंतवणूकदार नुकसान सोसतात व समाजात शेअर मार्केटला बदनाम करणारा एक वर्ग तयार होतो.

हे ही तेवढेच खरे कि म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांनी कमीत कमी तीन वर्षे धीर धरावा म्हणजेच म्युच्युअल फंड गुंतवणूक दिर्घ मुदतीची असावी.म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांनी रु १०००, ५००० किंवा लाख गुंतवले तरी फंड

| प्रकरण नं. ९ | # शेअर्स ट्रेडिंगमधील संक्षिप्त शब्द<br>**Abbreviation in Shares Trading** |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **AMFI** | Association of Mutual Funds of India | **CM** | Capital Market |
| **AUM** | Asset Under Management | **Co.** | Company |
| **AGM** | Annual General Meeting | **CPTC** | Collection and Purity Testing Centres |
| **AMFI** | Association of Mutual Funds of India | **CTCL** | Computer to Computer Link |
| **ARB** | Arbitrage | **CPI** | Consumer price index |
| **AMC** | Asset Management Company | **CDS** | Central Depository System |
| **AGM** | Annual General Meeting | **CNX** | CRISIL NSE 50 Index |
| **ADB** | Asian Development Bank | **COMEX** | Commodity Exchange, Inc |
| **ADR** | American Depository Receipts | **CCP** | Central Counterparty Clearing House |
| **AIFI** | All India Financial Institutions | **CAC** | Cotation Assistée en Continu French stock market inde |
| **ALBRS** | Automated Lending and Borrowing under Rolling Settlement | **CMP** | Civil Money Penalty |
| **AMEX** | American Stock Exchange | **CLB** | Company Law Board |
| **ARPU** | Average Revenue Per User | **CRA** | Credit Rating Agency |
| **ASC** | Accounting Standards Committee | **CRR** | Cash Reserve Ratio |
| **ATS** | Alternative Trading system | **CRS** | Compulsory Rolling Settlement |
| **BSE** | Bompay Stock Exchange | **DII** | Domestic Institutional Investers |
| **BPs** | Basis Points | **DIS** | Delivery Instruction Slip |
| **B-D** | Broker-Dealer | **DP** | Depository Participant |
| **BCH** | Brokers Clearing House | **DPG** | Dominant Promoter Group |
| **BMR** | Below Market Rate | **DQ** | Disclosed Quantity |
| **BOLT** | BSE (Bombay Stock Exchange) On-Line Trading | **DvP** | Delivery versus Payment |
| | | **DJIA** | Dow Jones Industrial Average |
| **BPO** | Broker Price Opinion | **DJUA** | Dow Jones Utility Average |
| **BST** | Buy, Sell, and Trade | **DLR** | Derivative Liquidity Ratio |
| **BTI** | BSE Training Institutes | **DPA** | Depository Participant Account |
| **BIFR** | Board for Industrial and Financial Reconstruction | **DPO** | Direct Public Offering |
| | | **DPS** | Dividends Per Share |
| **CRISIL** | (Credit Rating and Information Services of India Ltd) | **DRIP** | Dividend Re-Investment Plan |
| | | **DAX** | Deutscher Aktienindex (German stock index) |
| **CADT** | Client Allocation Details | **DCB** | Development Credit Bank Ltd |
| **CDS** | Currency Derivatives Segment | **DHFL** | Dewan Housing Finance Corporation |
| **CSD** | Collateral Security Deposit | **DRF** | Demat Request Form |
| **CDSL** | Central Depositories Services Ltd. | **DRR** | Debenture Redemption Reserve |